नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २१० | Issue - 210 | वार मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ | Blow- Tuesday Date 17 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## श्रीलंकेची जमीन आणि पाणी भारताच्या सुरक्षेच्या विरोधात वापरणार नाही

### श्रीलंका राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिला शब्द

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके हे ३ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. आपल्या भेटी दरम्यान दिसानायके यांनी एक मोठे वक्तव्य केले असून ज्यामुळे चीनला नक्कीच मिरची झोंबली असणार.

दिसानायके यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, श्रीलंकेच्या भूमीचा वापर भारताच्या सुरक्षेच्या विरोधात कोणत्याही परिस्थिती होऊ देणार नाही. त्यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे जेव्हा चीन हिंदी महासागरात सक्रीय होण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी त्यांनी आर्थिक संकटाच्या काळात भारताने केलेल्या मदतीसाठी आणि



पाठिंब्यासाठी मोदींचे आभार व्यक्त केले.

अनुरा कुमार दिसानायके यांनी नुकतेच श्रीलंकेच्या राष्ट्रपतीपदाचा पदभार स्विकारला आहे. राष्ट्रपती झाल्यानंतर हा त्यांचा पहिलाच परदेशी दौरा आहे. दिल्लीत आल्यानंतर त्यांनी भारताने केलेल्या स्वागतासाठी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांचे आभार व्यक्त केले. दिल्लीत पंतप्रधान मोदींशी चर्चा केल्यानंतर श्रीलंकेचे राष्ट्रपती म्हणाले की- मी भारताच्या पंतप्रधानांना आश्वासन दिले आहे, आम्ही आमच्या भूमीचा वापर भारताच्या हिताच्या विरोधात होऊ देणार नाही. भारतासोबतचे सहकार्य नक्कीच वाढेल आणि मला भारताला आमचा पाठिंबा कायम राहील याची खात्री द्यायची आहे. दोन्ही राष्ट्रप्रमुखांची ही बैठक अशा वेळी झाली आहे जेव्हा चीन हिंदी महासागरात आपली उपस्थिती वाढवत आहे. चीनचे 'मिशन हिंद महासागर' भारतासाठी धोकादायक मानले जात आहे.

श्रीलंकेच्या हम्बनटोटा बंदरात चीनची उपस्थिती वाढत आहे. यामुळे भारताची काळजी वाढली आहे. चीनने कर्जाच्या बदल्यात हे बंदर स्वत:च्या ताब्यात घेतले आहे. या बंदरात गुप्तचर जहाज देखील पाठवले जातात. गेल्या दोन वर्षात चीनने २५ हजार टनाचे युआन वांग ५ हे जहाज बंदरात तैनात केले आहे. ज्यावरून सॅटेलाइट आणि बॅलेस्टिक मिसाइल लक्ष ठेवता येणे शक्य आहे. भारतासाठी हीच मोठी डोकेदुखी ठरत आहे.

चीनने हम्बनटोटा बंदर ९९ वर्षांच्या भाड्यावर घेतले आहे. या बंदराच्या उभारणीसाठी चीनकडून घेतलेल्या १.७ अब्ज कर्जापैकी दरवर्षी १०० मिलियन डॉलर्सची परतफेड श्रीलंकेला करता आली नाही. बंदराचा पहिला टप्पा २०१० मध्ये पूर्ण झाला. भारतासोबतच्या या नव्या करारात श्रीलंकेने आपली जमीन आणि पाणी भारताच्या सुरक्षेच्या विरोधात कोणत्याही प्रकारे वापरले जाणार नाही, असे आश्वासन दिले आहे. तसेच, प्रादेशिक स्थिरतेवर परिणाम होईल असे कोणतेही काम केले जाणार नाही असे ही स्पष्टपणे सांगितले आहे.

## अधिवेशन सोडून भुजबळ निघाले; छगन भुजबळ ३३ वर्षांनंतर पुन्हा धमाका करणार?

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नागपूर: फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यानं नाराज झालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ नागपुरहून निघाले आहेत. नागपुरात विधिमंडळाचं अधिवेशन सुरु असताना भुजबळ तिकडून नाशिकच्या दिशेनं रवाना झाले आहेत. ते उद्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेणार आहेत. कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून ते कोणता निर्णय घेणार याकडे आता राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. नागपुरात अधिवेशन सुरु असताना छगन भुजबळ नाशिकला निघाले आहे. 'उद्या येवला, लासलगा-वला जाईन, कार्यकर्त्यांना भेटेन, त्यांच्याशी बोलून, मग काय ते ठरवेन,' असं भुजबळांनी सांगितलं. समता परिषदेच्या कार्यकर्त्यांना भेटेन. नाशिकम धल्या कार्यकर्त्यांना भेटेन. अन्य जिल्ह्यांमधील लोकांशी बोलेन. त्यानंतर काय करायचं ते ठरवेन, असं भुजबळ म्हणा-ले. मंत्रिमंडळातून डावलण्यात आल्यानं भुजबळ नाराज आ-हेत. त्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न राष्ट्रवादीकडून सुरु आहेत. त्यांना राज्यसभेची ऑफर देण्यात आलेली आहे. पण भुजबळ राज्यसभेवर जाण्यास तयार नाहीत. ते उद्या कार्यकर्त्यांशी बोलणार आहेत. पुढील भूमिकेबद्दल त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. त्यामुळे भुजबळ नेमकं काय करणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. छगन भुजबळांनी १९९१ मध्ये शिवसे-नेत बंड केलं. त्यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करत नागपूरचं अधिवेशन सुरु असताना कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती. भुजबळांचं बंड आणि त्यांनी घेतलेली मंत्रिपदाची शपथ त्यावेळी चर्चेचं विषय होता.

## राज्य सरकारच्या पुरवणी मागण्यांमध्ये लाडक्या बहिणींसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**




नागपूर: महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात महत्त्वा-ची माहिती आहे. सत्तेत आल्यानंतर लाडकी बहीण योजनेतील मदतीचा हफ्ता १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करणार अशी घोषणा महायुतीनं केली होती. पण या २१०० रुपयांसाठी लाडक्या बहिणींना बरीच प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे. कारण सध्या तरी लाडक्या बहिणींना दिला जाणारा हफ्ता वाढवण्याच्या मानसिकतेत सरकार नाही.

लाडक्या बहिणींसाठी पुरवणी मागण्यांमध्ये १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आ-लेली आहे. योजनेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी ही तरतूद करण्यात आल्याचं समजतं. महिलांना दिले जाणारा हफ्ता १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्याची तरतूद अद्याप तरी करण्यात आलेली नाही. त्यामुळे महिलांना २१०० रुपयांसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. लाडकी बहीण योजनेचा हफ्ता वाढवण्यासाठी प्रशासकीय आणि सरकारी पातळीवर सध्या तरी कोणत्याही हालचाली सुरु नाहीत. पुरवण्या मागण्यांमध्ये अवघ्या १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. योजनेसाठीच्या तांत्रिक आणि प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. यामधून १५०० रुपयांचा हफ्ता २१०० रुपये करणं शक्य होणार नाही.

लाडकी बहीण योजनेवर होणारा वार्षिक खर्च ४६ हजार कोटी रुपयांच्या घरात जातो. जुलै ते मार्च या कालावधीत योजनेवर ३६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यातील १७ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. डिसेंबर ते मार्च या कालावधीत १९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. लाडकी बहीण योजनेवर महिन्याकाठी ३५०० कोटी रुपयांचा खर्च होतो. लाडकी बहीण योजनेचा हफ्ता २१०० रुपये करायचा असल्यास बजेटमध्ये मोठी वाढ करावी लागेल. दर महिन्याला किमान १ हजार कोटी रुपयांची वाढ केली तरच २१०० रुपयांचा हफ्ता लाडक्या बहिणींना दिला जाऊ शकतो. त्यामुळे शिल्लक असलेले १९ हजार कोटी अधिक आता करण्यात आलेली १४०० कोटी रुपयांची तरतूदही २१०० रुपयांचा हफ्ता करायचा असल्यास कमी पडेल.

## परभणी हिंसाचाराची सी.बी.आय चौकशी करण्यात यावी

### रिपाइं प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांची मागणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र - परभणी या ठिकाणी मुख्य चौकात असलेल्या, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिका प्रतिमेची विटंबना एका माथेफिरूने केली.त्यामुळे परभणी शहरामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले.या अवमान घटनेच्या निषेध आंदोलनानंतर पोलिसांनी आंदोलकांना बेदम मारहाण केली आहे या आंदोलनात विधी या शैक्षणीक वर्षा मध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थी भीमसैनिक सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी याचा कोठडीत मृत्यू झाला या प्रकरणाची सखोल चौकशी करावी.या प्रकरणी मारहाण करणारे जे पोलिस जबाबदार असतील त्यांना तात्काळ नोकरीतून बडतर्फ करावे अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी केली आहे.

केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष मा.रामदासजी आठवले यांच्या आदेशानुसार आज राज्यामध्ये सर्वत्र रिपब्लिकन पक्षातर्फे राज्यभर निषेध आंदोलन घेण्यात आले. सोलापूर शहर या ठिकाणी प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली तसेच सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी या शहीद भीमसैनिकास भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद येथे पूनम गेट समोर निदर्शने करण्यात आले.

परभणी येथील आंदोलनानंतर बौध्द वस्तीत भिमनगर, प्रियदर्शीनगर इत्यादी विभागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कोंबींग ऑपरेशन करून बौध्द बांधवांना मोठ्या प्रमाणात मारहाण केली.सोबतच त्यांच्या घराची,मोटार सायकली, कारची पोलीसांनी आणि त्यांच्या भाडोत्री गूंडांनी नुकसान केले.अनेक निष्पाप नागरिकांना



पोलीसांनी बेकायदेशीर अटक केल्याचे समजते.अनेक महिलांना आणि शालेय, कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर चुकीच्या पध्दतीने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.वरील सर्व प्रकरणाची सी.बी.आय.मार्फत चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर व पोलीस गुंडांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आली. यावेळी के.डी.कांबळे, अतुल नागटिळक, पवन थोरात, राजेश उबाळे, शामसुंदर गायकवाड, अविनाश मडीखांबे, शाम धुरी, सुशील सरवदे, सोमनाथ घोडकुंबे, शिवा गायकवाड, विकास सरवदे, अमोल वामने, यशवंत माने, सदैप्पा झळकी, सतीश शिंदे, सुग्रीव जेठीथोर, आनंद जानराव, राजू गुल्लापल्ली, बसवराज सोनकांबळे, शिवा उबाळे, समीर नदाफ, किशोर शिंदे, श्रीनिवास सरवदे, महादेव बाबरे, प्रभाकर शहापुरे, सिद्धार्थ बनसोडे, शिवम सोनकांबळे, सचिन गायकवाड, बापू सदाफुले, प्रबुद्धकुमार दोड्यानुर, विशाल कांबळे, उपगुप्त चौधरी, राहुल वाळके, बंटी घाडगे, दावला सुर्वे, दत्ता कांबळे, कालिदास दीलपाक, जानाप्पा कांबळे, गोविंद तळभंडारे, सचिन ढेपे, सचिन कांबळे, विकास चव्हाण, संजय गायकवाड, सचिन शिंदे, शितल कांबळे, बापू शिवशरण, हनुमंत वाघमारे, अनिल बोराळे, राहुल गाडे, अक्षय चंदनशिवे, हरीश जाधव, कुणाल वाघमारे, पप्पू गायकवाड, बापू कापुरे, संतोष गायकवाड, कुणाल मस्के, मयूर क्षीरसागर, विशाल कांबळे आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रिपब्लिकन पक्षाने केले राज्यभर निषेध आंदोलन

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची मागणी

## परभणीतील भिमसैनिक शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युस जबाबदार पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

**मुंबई (कमलाकर सोनकांबळे)**

दि. १६ : परभणीतील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ आंबेडकरी जनतेने केलेले तीव्र आंदोलन चिरडण्यासाठी पोलिसांनी बळाचा अतिरेकी वापर करुन निरपराधांनाही जिवघेणी मारहाण केली आहे.पोलिसी मारहाणीत काही महिला आणि विद्यार्थी गंखीर जखमी आहेत.त्यातील निरपराध विद्यार्थी असणारा तरुण भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा कोठडीत मृत्यु झाला असुन जबर मारहानीमुळे त्यांचा मृत्यु झाल्याचे पोस्टमॉर्टम रिपोर्ट मध्ये सत्य उघड झाले आहे.त्यामुळे पोलिस हे रक्षक आहेत कि भक्षक आहेत असा सवाल करित रिपब्लिकन पक्षाने परभणीतील पोलिसी दडपशाहीच्या निषेधार्थ आज राज्यभर तिव आंदोलन केले आहे.

परभणीतील भिम सैनिक शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युस जबाबदार पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करावी.या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी तातडीने लक्ष देऊन दोषी पोलिसांना नोकरीतुन बडतर्फ करावे.मनुष्यवधाच्या गुन्हा दाखल करून जलदगती न्यालयात खटला चालवून दोषी पोलिसांना कठोर शिक्षा करावी. पोलिसांनी कायदा हातात घेऊ नये पोलिसांची प्रतिमा डागाळली जाईल असे पोलिसांनी कृत्य करु नये. ज्या पोलिसांनी



निरपराध आंदोलकांवर अतिरेकी मारहान केली आहे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली आहे.परभणी आंदोलनातील निरपराध आणि शांततेने आंदोलन करणाऱ्या आंदोलकावरील गुन्हे काढुन टाकावेत . सी.सी.टिव्ही पाहुन निर्दोष व्यक्तींना तात्काळ मुक्त करावे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे.

सोलापुर शहरात रिपाइं महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वात परभणी प्रकरणी तीव निषेध आंदोलन करण्यात आले.सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कोठडीतील मृत्यु प्रकरणी दोषी पोलिसावर कठोर कारवाई ची मागणी या निषेध आंदोलनात राजाभाऊ सरवदे यांनी केली.

दिवगंत शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुंटुंबीयांना शासना-ने सांत्वनापर २५ लाख निधी द्यावा आणि त्यांच्या कुंटुंबातील एक व्यक्तिला शासकीय नोकरी द्यावी.या आंदोलनात वत्सलाबाई मानवते या महिलेला मारहान करणाऱ्या पोलिसांवर कठोर कारवाई करावी. वत्सलाबाई मानवते यांना राज्य सरकारने १५ लाखाची मदत करून त्यांचे पुनर्वसन करावे. संविधान विटंबना आणि त्यानंतरच्या निषेध आंदोलनावर पोलिसांनी केलेल्या अमानुष मारहानीचा आणि कोंबीग ऑपरेशनची या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी. परभणी शहरातील सर्व पोलिस स्टेशनचे सी.सी.टिव्ही तपासावे. न्यायालयीन कोठडीत असलेल्या आंदोलकांची वैद्यकीय तपासणी करावी.या मागण्यासाठी तसेच संविधानाच्या सन्मानासाठी; संविधानाची विटंबना करणाऱ्यांचा निषेधासाठी आणि दिवंगत शहीद भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासाठी आज संपूर्ण राज्यभर रिपब्लिकन पक्षाने तीव निषेध आंदोलन केले.

मुंबईत रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश सिध्दार्थ कासारे यांच्या नेतृत्वात विविध ठिकाणी आंदोलन झाले.मुलुंड येथे रिपाइंचे अजित रणदिवे,योगेश शिलवंत,राजु साळ-वे यांच्या नेतृत्वात आंदोलन करुन परभणीतल्या संविधान विटंबनेचा निषेध आणि पोलिसी दडपशाहीचा निषेध करण्यात आला.उत्तर मुंबईचे जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड यांच्या नेतृत्त्वात दहिसर येथे ,चेंबुर मध्ये रवी गायकवाड,घाटकोपर मध्ये राजाभाऊ गांगुर्डे,बांद्रा येथे अमित तांबे यांच्या नेतृत्वात निषेध आंदोलन क्करण्यात आले.संपूर्ण मुंबई,ठाणे,पुणे,नाशिक सह संपूर्ण राज्यात रिपब्लिकन पक्षा-ने तीव आंदोलन करुन पोलिसांनी केलेल्या अत्याचाराचा तीव निषेध केल्याची माहीती रिपाइं चे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनावणे यांनी दिली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### ३३ वर्षापूर्वीची पुनरावृत्ती

नागपुरात अधिवेशन सुरु असताना छगन भुजबळ नाशिकला निघाले आहे. येवला, लासलगावला जाईन, कार्यकर्त्यांना भेटेन, त्यांच्याशी बोलून, मग काय ते ठरवेन,' असं भुजबळांनी सांगितलं. समता परिषदेच्या कार्यकर्त्यांना भेटेन. नाशिकमधल्या कार्यकर्त्यांना भेटेन. अन्य जिल्ह्यांमधील लोकांशी बोलेन. त्यानंतर काय करायचं ते ठरवेन, असं भुजबळ म्हणाले. मंत्रिमंडळातून डावलण्यात आल्यानं भुजबळ नाराज आहेत. त्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न राष्ट्रवादीकडून सुरु आहेत. त्यांना राज्यसभेची ऑफर देण्यात आलेली आहे. पण भुजबळ राज्यसभेवर जाण्यास तयार नाहीत. ते उद्या कार्यकर्त्यांशी बोलणार आहेत. पुढील भूमिकेबद्दल त्यांच्याशी चर्चा करणार आहेत. त्यामुळे भुजबळ नेमकं काय करणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. छगन भुजबळांनी १९९१ मध्ये शिवसेनेत बंड केलं. त्यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करत नागपूरचं अधिवेशन सुरु असताना कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती. भुजबळांचं बंड आणि त्यांनी घेतलेली मंत्रिपदाची शपथ त्यावेळी चर्चचं विषय होता. आता ३३ वर्षानंतर भुजबळ नागपूर अधिवेशन सुरु असताना पुन्हा एकदा मोठा निर्णय घेणार का, याची उत्सुकता आहे. २१ डिसेंबर १९९१ रोजी नागपुरात मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. तेव्हा भुजबळ यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत वसुधा देशमुख, राजेंद्र गोडे, भरत बाहेकार, शंकर नम, जयदत्त क्षीरसागर, शालिनी बोरसे या सहा जणांनी उपमंत्रिपदाची शपथ घेतली होती. शपथविधी सोहळ्याच्या २ दिवस आधीच भुजबळांनी ११ आमदारांसह शिवसेना सोडली होती. त्यावेळी हिवाळी अधिवेशन सुरु होतं. भुजबळ आमि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांना मंत्रिमंडळात घेण्यात येईल अशी चर्चा त्यावेळी होती. मंत्रिमंडळ विस्तारापूर्वी पक्षश्रेष्ठींशी चर्चा करायला मुख्यमंत्री नाईक १९ डिसेंबरच्या रात्री उशिरा नागपुरहून दिल्लीला गेले होते. २० डिसेंबरच्या सकाळी दिल्लीतून ते मुंबईला परतले. २० डिसेंबरच्या दुपारी नाईक यांनी त्यावेळचे राज्यपाल सुब्रमण्यम यांना नव्या मंत्र्यांची यादी दिली. त्यानंतर २१ डिसेंबरला भुजबळांसह सहा जणांचा शपथविधी झाला.

# लोकनाट्य तमाशा जपतोय समाज जागृतीचे कार्य...!
# गावोगावी होताना दिसतोय तमाशा : आजही पसंती कायमच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी :

आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आजही गेल्या १७ व्या शतकापासून महाराष्ट्रामध्ये तमाशा हा अतिशय लोकप्रिय असणारा कलाप्रकार आहे. या तमाशा सादरीकरण करणाने आज समाजात बराच बदल होताना पाहायला मिळत आहे. तमाशात जे घडलेल्या प्रसंगावर सत्य कथन करुन दाखवितात. यामुळे समाजावर थेट प्रभाव पडतो. म्हणून त्या शतकापासून आजच्या जगातही तमाशा हे लोकनाट्य समाजात जागृती करतोय आहे. हे वास्तव नाकारता येत नाही.

हा कलाप्रकार सिद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रात गोंधळ, जागरण, बळीराजा आणि महासुभा, ज्योतिबा यांच्या कार्याची जागृती पर गीत गायन जागरण, वाघ्यामुरळी, दशावतार, बहुरूपी, वासुदेवाची गाणी, पोतराज इ. लोक कलाप्रकार प्रचलित होते. या सर्व नाटयात्मक लोककलाप्रकारात आणि तमाशामध्ये तांत्रिक अंगाच्या दृष्टीने आणि वाङ्.मयीन बाजूने काहीएक प्रमाणात साधर्म्य आढळते. तमाशा हा गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग अशा पाच अंगांनी समृद्ध झालेला आहे.

तमाशाची उत्पत्ती

'भारतीय सांस्कृतिकोशा'त 'तमाशा' या शब्दाच्या उत्पत्तीविषयी पुढील माहिती मिळते. 'तमाशा' हा शब्द अरबी असून त्याचा अर्थ 'प्रेक्षणीय दृश्य' असा आहे. तमाशा संस्थेच्या शिल्पकारांना असलेली 'शाहीर' ही संज्ञाही मूळ 'शायर' किंवा 'शाहर' या अरबी शब्दापासून बनलेली आहे. तमाशा संस्थेचे आणि तिच्या शिल्पकाराचे नाव अरबी असल्यामुळे ही संस्था मुसलमानांच्या प्रभावातून उदय पावली असावी, असा काही विद्वानांचा कयास आहे. 'तमाशा' परंपरेविषयीचा संदर्भ मराठी विश्वकोशातही सापडतो, तो पुढीलप्रमाणे आहे. 'तमाशा' हा शब्द मूळचा मराठी भाषेतील नसून तो उर्दूतून मराठीत आला आहे. १३-१४ व्या शतकात दक्षिण भारतात मुसलमानी अंमल सुरू झाल्यापासून तो मराठीत आढळतो. एकनाथांच्या एका भारुडात 'बड़े बड़े तमाशा 'देखें' अशी ओळ आहे. अशी माहिती तमाशाच्या जन्माविषयी सापडते.

अशाप्रकारे तमाशाचे स्वरुप



तमाशाची एकंदर प्रकृती पाहिली तर असे दिसून येईल की, १८ व्या शतकाच्या सुरुवातीला वीरांच्या विषयवासनेवर उतारा म्हणून जन्मलेला हा खेळ १९ व्या शतकाच्या सुरुवातीला भक्ती, नीति, ब्रह्मज्ञान यात आला. म्हणजे तमाशाचे हाड शूरवीरांच्या शृंगाराचे, तर मांस सात्त्विकतेचेच दिसते. हाडाचे वळण आणि मासांने दिलेला आकार यांनी प्रकृती बनते, तसे शृंगाराच्या हाडाने आणि सात्त्विकतेच्या मांसाने तमाशाचे शरीर बनले आहे. तमाशाच्या गाडीचे एक चाक शृंगाराचे तर दुसरे ब्रह्मज्ञानाचे होते. या दोन्ही चाकांना जोडणारा कणा शूरवीरांच्या पराक्रमाचा होता. असे नामदेव व्हटकर म्हणतात. साधारणपणे असे तमाशाचे स्वरूप आहे. तमाशाचे खरे स्वरूप जरी पेशवाईतच उत्तर पेशवाईतच उदयास आले असले तरी तो प्रकार महाराष्ट्रात पूर्वीपासूनच अस्तित्वात होता असे दिसते.



महाराष्ट्रात अनेक तमाशा फड असून आजमितीला प्रामुख्याने रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, काळू बाळू, दत्ता महाडिक, चंद्रकांत ढवळपुरीकर यांचे संच अतिशय प्रसिद्ध आहेत. तमाशा हा गावोगावी भरणाऱ्या यात्रेनिमित्त आणि त्यानंतर च्या काळात कापडी तंबू/कनात बांधुन तिकीट विक्री करून सादर केला जातो.

महाराष्ट्रातील लोकप्रिय कलाप्रकार असलेल्या तमाशा क्षेत्रासाठी लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी अनेक वगनाट्ये, लावण्या, लोकगीते, सवाल-जवाब, गण-गवळण आणि फार्स असे विविधांगी साहित्य निर्माण केले आणि महाराष्ट्रातील सर्व प्रमुख तमाशा मंडळांना पुरवले.

# कृषी विभागाने श्रमदानातून बांधलेल्या वनराई बंधाऱ्यावर आदिवासी कुटुंब करणार भाजीपाला लागवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील मौजे-देपोली या आदिवासी बहुल गावात शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मदतीने श्रमदानातून साखळी वनराई बंधारे बांधले.




यंदाचा पावसाळा हंगाम लांबल्याने छोटे छोटे नाले, ओढे यावर पाणी वाहत असून सदरचे वाहणारे पाणी वेळेतच अडविले ते त्याचा उपयोग पिकांना होऊ शकतो अन्यथा सदरचे पाणी काही महिन्यात आटून जाते.

मौजे देपोली येथील शेतकरी उपलब्ध असलेल्या पाण्यावर थोडाफार भाजीपाला लागवड करत असतात,परंतु सदरच्या नाल्यावरील पाणी हे पीक वाढीच्या अवस्थेत च आटून जात असल्याने फार थोडया प्रमाणात लागवड करत होते. म्हणून देपोली येथील शेतकऱ्यांनी व कृषी विभागातील कृषी सहाय्यक मनीषा निळे, वैभव लढी,व .अर्चना धलपे तसेच कृषि पर्यवेक्षक विवेक दोंदे यांच्या पुढाकाराने तेथील ओढ्यावर साखळी पद्धतीने ३ वनराई बंधारे श्रमदानातून बांधले.याचा फायदा बाजूच्या शेतकऱ्यांना भाजीपाला लागवडीसाठी झाला असून तेथे गवार,हरभरा,व इतर पालेभाज्या लागवडीचे क्षेत्र वाढले असून सदरच्या उत्पादनावर आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल असे लाभार्थी शेतकरी सांगत आहेत.

# सोलापूर जिल्ह्यावर मंत्रिमंडळ विस्तारात नेहमीच अन्याय : प्रा. राहूल रुही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : मागचे पाच वर्ष सोलापूर जिल्ह्यात एकही मंत्रिपद देण्यात आलेले नव्हते सोलापूर जिल्ह्याला स्थानिक पालकमंत्र्यांची गरज असताना वेळोवेळी उपरे पालकमंत्री सोलापूर जिल्ह्यावर लादण्यात आले यंदा महायुतीने जिल्ह्यामध्ये चांगली कामगिरी केली असताना देखील सोलापूर जिल्ह्याचे भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सचिन दादा कल्याण शेट्टी यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात महायुतीने घवघवीत यश म्हणून देखील त्यांना मंत्रिपद देऊन जिल्ह्याचे पालकमंत्री बहाल करण्यात येईल असे सर्वांना अशा असताना चर्चेत असून देखील सोलापूर जिल्ह्याला आणि सचिन कल्याण शेट्टी यांना डावल्याने जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांसह सोलापूरकर मंत्रिमंडळ स्तरावर नाराज असून सगळीकडे नाराजीचा सूर दिसून येत आहे अकरा विधानसभेने बनलेल्या सोलापूर जिल्ह्याला नेहमीच तुझ्या भावाची वागणूक देण्यात आल्याची भावना यावेळी प्राध्यापक राहुल यांनी बोलून



दाखवली मंत्रिमंडळ विस्तारामध्ये दोन मंत्री अजून शिल्लक असून सचिनदादा कल्याणशेट्टी यांना मंत्रिपद द्यावे किंवा केंद्रीय मंत्री अमित शहा राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शब्दाप्रमाने आरपिआय ( आठवले) गटाला मंत्रिपद देऊन लोकनेते राजाभाऊ सरवदे यांना मंत्रिपद देऊन जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी प्रा. राहूल रूही यांनी केली आहे




**घाटकोपर येथे भीम सैनिकांनी परभणी येथे पोलिसांच्या अत्याचारानी हत्या केली यांच्या सरकारच्या निषेधार्थ रैली काढण्यात आली या वेळेस सर्व पक्ष नेते उपस्थित होते शिवसेना उद्धव ठाकरे संघटक नेते विलास रूपवते कामगार नेते रमेश जाधव, मंगेश पगारे नगरसेवक सुरेश आवळे ठझखख नेते चव्हाण मामा,रवि नेटावट, सतिश शिंदे, प्रविण आखाडे, देविदास अहीरे,राहुल बर्वे,अनिल मोरे,कुणाल बागुल, रोहित जगताप, रीयाज शेख,बाळू सोनावणे, पवण जाधव, प्रकाश आकूश, सर्व भीम सैनिक उपस्थित होते**

# कर्मवीर ॲड. विठ्ठलराव हांडे यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा : मुख्याध्यापक वाजे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सिन्नर /प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे भूतपूर्व सभापती कर्मवीर डव्होकेट विठ्ठलराव हांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.व्यासपीठावर सोमनाथ पगार,सोमनाथ गिरी, कचेश्वर शिंदे,अलका काळोगे,विद्या ठाकरे वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कर्मवीर ड. हांडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ड यांच्या जीवन व कार्याविषयी उपशिक्षक अरुण डावरे यांनी माहिती दिली.




यावेळी बोलतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे म्हणाले की, डव्होकेट हांडे यांनी मविप्र संस्थेसाठी अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे सामाजिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक आदींसह सर्वच क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आव्हान मुख्याध्यापक वाजे यांनी केले. सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले.यावेळी सोमनाथ बोडके,सीमा गोसावी,डी.ए.रबडे, जयश्री गोहाड,रेवणनाथ कांगणे,सुदाम वारुंगसे,किशोर शिंदे,रवि गोजरे,ज्ञानेश्वर कडभाने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे आरोग्य तपासणी व ताण तणाव शिबिर संपन्न

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ चारुदत्त शिंदे , निवासी वैद्यकिय डॉ संदीप सुर्यवशी , यांच्या आदेशाने उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक,डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ कविता धारराव व डॉ निलेश जेजुरकर, मानसोपचार तज्ञ यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करण्यात आले,

**मानसिक आजार ही आजार असून ती लाज वाटण्यासारखी गोष्ट नाही. प्रत्येक व्यक्तीला मानसिक आरोग्य समस्या येऊ शकतात. त्यामुळे वेळेत उपचार व समुपदेशन घेतल्यास मानसिक आजारांवर मात करता येऊ शकते.मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकंच महत्त्वाचं आहे.**

**- डॉ.कविता धारराव.**

**(नगराध्यक्षा निफाड नगरपंचायत)**

यावेळी डॉ राजीव तांभाळे यांनी शिबीराचा मुख्य उद्देश सांगितला. मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे, मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांवर प्रकाश टाकणे, आणि या समस्यांशी झगडणाऱ्या व्यक्तींना समर्थन देणे आहे या प्रसंगी

डॉ निलेश जेजुरकर यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व व उपाय या प्रसंगी विशद केले असून या आजाराबाबत जागरूकता वाढवणे , मानसिक आजारांबाबत असलेला समाजातील गैरसमज आणि कलंक दूर करणे, मानसिक आरोग्यासाठी सल्ला व उपचार गरजूंपर्यंत मोफत पोहोचविनेचे काम केले जाते, मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे,मानसिक आरोग्यासाठी धोरणे व सुविधा विकसित करण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे ..असे आवाहन केले उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील रुग्ण कल्याण समिती सदस्य मधुकर शेलार यांनी उपस्थित रुग्णांना या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले असून आजच्या धावपळीच्या युगात सर्वानाच मानसीक तणावाला सामोरे जावे लागत आहे. त्यातील खूप कमी व्यक्ती मानसीक तणावातून बाहेर पडतात. जगाला मानसीक



आरोग्याचे महत्व समजवण्यासाठी आरोग्य विभागाकडून १० ऑक्टोबर जागतीक मानसीक आरोग्य दीन साजरा केला जातो . मानसीक आजारांवर किंवा समस्यांवर वेळीच तज्ञ यांचा सल्ला घेणे फायदेशीर ठरते.असा संदेश दिला. या शिबिराचे सूत्रसंचालन समुपदेशक नितिन परदेशी यांनी केले तर आभार तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे यांनी केले. या प्रसंगी. डॉ निलेश जेजूरकर, समाजसेवा अधिक्षक गोपाळ घोडके, मनोविकृती सामजिक कार्यकर्ता अरविंद पाईकराव, स्टाफ नर्स शितल अहिरराव, रेकॉर्ड किपर वैशाली पाटिल तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाडचे डॉ लाड , डॉ गावले , डॉ कविता कदम, मानसशास्त्र तज्ञ रोशनी कादरी, चंद्राते , सचिन गोसावी, भाऊसाहेब कोल्हे, इन्चार्ज सिस्टर जगताप, रुग्ण कल्याण समिती सदस्य चोरडिया, मधुकर शेलार, सुनील राठोड, व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ६४० जुन्या प्रकरणासह एकुण १९,८३१ प्रकरणे सामंजस्याने निकाली

## १० जोडप्यांचे वैवाहिक संबंध सामंजस्याने पुर्नस्थापित ; सोलापूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रिय लोकअदालत यशस्वीपणे संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये चौथे राष्ट्रिय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोकअदालत सोलापूर जिल्हयातील एकुण १९८३१ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोकअदालतीच्या माध्यमातून एकुण रक्कम रु. ७१,०५,१४,६०५/- इतके मुल्य असणा-या प्रकरणांमध्ये सामंजस्याने तडजोड करण्यात आली.





चौथ्या राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन मा. श्री. मो. सलमान आझमी, अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा न्यायाधीश श्री. जे. जे. मोहिते, जिल्हा सरकारी वकिल अॅड. प्रदिपसिंग रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अमित आळंगे, सोलापूर महानगरपालिका उपायुक्त श्री. आशिष लोकरे, सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री. सुधीर खिराडकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री. राजन माने, भारतीय स्टेट बँकेचे वरिष्ठ शाखाधिकारी श्री. अनिकेत फले, विधीज्ञ श्री. व्ही. एन. देशपांडे आणि जिल्हा न्यायालय प्रबंधक श्रीमती. पल्लवी पैठणकर, विधीज्ञ, पक्षकार आधी उपस्थित होते.

सोलापूर जिल्हा न्यायालय तसेच सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आले. राष्ट्रिय लोकअदालत मध्ये ४४२०१ प्रलंबित प्रकरणे, दाखलपुर्व ९४५२५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यापैकी प्रलंबित ५०६२ प्रकरणांमध्ये तडजोड झाली आणि १४७६९ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीच्या पार्श्वभुमिवर निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालतमध्ये सोलापूर मुख्यालयाच्या ठिकाणी पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आर. यु. नागरगोजे, दिवाणी न्यायाधीश, श्रीमती. एस. ए. आर. सैयद, दिवाणी न्यायाधीश, पी. पी. पेठकर, दिवाणी न्यायाधीश, न्यायदंडाधिकारी श्रीमती. डी. डी. कोळपकर, न्यायदंडाधिकारी श्रीमती. पी. व्ही. चव्हाण, न्यायदंडाधिकारी श्रीमती. एस. पो. मर्डेकर, न्यायदंडाधिकारी श्रीमती. व्ही. व्ही. रजपूत कुलकर्णी, न्यायदंडाधिकारी श्री. एस. पी. पाटील, न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. एम. रेडकर, न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. पी. कुंभार यांनी काम पाहिले. पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील लोकरक्षक श्रीमती. स्नेहल राऊत, एस. एम. झुरळे, एम. बी. सोलनकर, रेवण पाटील, जी. बी. नवले तसेच व्ही. व्ही. कुर्ले, श्रीमती. डी. व्ही. किणगी, श्री. एस. आर. शेंडगे आदींनी काम पाहिले.

चौथे राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्याकरीता पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिका आयुक्त श्रीमती. शितल तेली उगले, उपायुक्त आशिष लोकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादिन शेळकंदे, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने यांचे मोलाचे सहकार्य लाभले राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा न्यायालय, सोलापूर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

स्पेशल ड्राईव्ह -

राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजनापूर्वी दि. ०९ डिसेंबर २०२४ ते दि. १३ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. विशेष मोहिमेमध्ये ४० वर्षे जुनी ०२, ३० वर्षे जुनी ३, २० वर्षे जुनी १, १५ वर्षे जुनी २४, १० वर्षे जुनी १२८, ५ वर्षे जुनी ८८० व इतर अशी एकुण ३३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली.

**लोक न्यायालयाची यशस्वी गाथा-** लोक अदालत दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी पॅनल कमांक १ मध्ये एकूण ३२ प्रकरणांची यशस्वी तडजोड झाली. विशेषतः एल.ए. आर. १०३/२०२० हे प्रकरण दि. १५ डिसेंबर २०२० रोजी दाखल होवून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ या न्यायालयात प्रलंबित होते. सदर प्रकरण हे रु. १,३२,९३०००/- या रक्कमेवर तडजोड झाली. सदर प्रकरणामध्ये एकूण १५ प्रतिवादी होते त्यांच्यामध्ये त्यांच्या वैयक्तिक हिश्यांच्या वाटणीसाठी बराच काळ प्रकरण प्रलंबित होते. सदर प्रकरण हे लोक न्यायालयाकडे सादर करण्यात आले. सदर प्रकरण हे लोक न्यायालयामध्ये तडजोड होवून सर्व प्रतिवादींनी भूसंपादन संदर्भ कमांक १०३/२०२० ची तडजोड रक्कम रु. १,३२,९३०००/- त्यांच्या सहमतीने केलेल्या हिश्यांच्या प्रमाणात विभागणी झाली.

एम. पी. एस. सी. स्पर्धा परिक्षेची तयारी करणारा तरूण व त्याच्या पत्नी मध्ये गैरसमजातून झालेल्या वादाचे रूपांतर ९ महिने एकमेकांपासून वेगळे राहण्यात झाले व परिणामी घटस्फोटापर्यंत येवून ठेपलेल्या प्रकरणात समूपदेशनाने व समोपचाराने केलेला प्रयत्नाला यश आले. यात दोघांनी त्यांच्या मुलीचे भविष्य व स्पर्धा परिक्षेकरिता लागणारे तणाव मुक्त वातावरण याचा सखोल विचार करून एकत्र येण्याचा निर्णय घेवून एकमेकांविरूद्धचे सर्व वाद व अर्ज लोक अदालत मध्ये मागे घेवून एकत्र नांदण्यास गेले.

शेतकरी पती व गृहीणी असलेली पत्नी व तीन अपत्ये जे सुमारे चार वर्षांपासून किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एकमेकांपासून विभक्त राहत होते. समूपदेशानाने व समोपचाराने त्यांच्यात मनोमिलन घडवून त्यांच्या व त्यांच्या मूलांच्या भविष्याचा विचार रूजवील्याने त्यांनी सारासार विचार करून एकमेकांविरूद्धचे सर्व हेवे दावे लोक अदालत मध्ये मागे घेवून एकत्र नांदण्यास गेले.

सुमारे सात वर्षांपूर्वी झालेल्या एका उच्च शिक्षित डॉक्टरेट प्राप्त प्राध्यापकाचे झालेले लग्न. वैचारिक मतभेदातून ते पती-पत्नी विभक्त राहिले. समूपदेशानाने व समोपचाराने त्यांच्यात मनोमिलन घडवून त्यांच्या भविष्याचा विचार रूजवील्याने त्यांनी सारासार विचार करून एकमेकांविरूद्धचे सर्व अर्ज व दावे लोक अदालत मध्ये मागे घेवून एकत्र नांदण्यास गेले.

ठाणे स्थित कॉर्पोरेट क्षेत्रातील पती व गृहीणी असलेली पत्नी जे सुमारे एक वर्षांपासून शुल्लक कारणावरून एकमेकांपासून विभक्त राहत होते समपुदेशानाने व समोपचाराने त्यांच्यात मनोमिलन घडवून भविष्याचा विचार रूज्वील्याने त्यांनी सारासार विचार करून एकमेकांविरूद्धचे सर्व हेवेदावे लोक अदालत मध्ये मागे घेवून एकत्र नांदण्यास गेले.

या सर्व प्रकरणांमध्ये मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एम. एस. आझमी सो, मा. मा. प्रमुख कौटुंबिक न्यायाधीश श्रीमती एस. व्ही. घारगे सो, मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. जे.जे. मोहिते सो व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे मा. सचिव श्री. उमेश देवर्षी सो यांच्या प्रयत्नाला यश आले सदर लोक अदालतीच्या सर्व यशस्वी प्रकरणांमध्ये सहभाग घेतलेल्या पक्षकारांना त्यांच्या पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या, अशी माहिती अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांनी दिली आहे.

---

## थोडक्यात...

### अज्ञात रिक्षाची एकास धडक; चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात रिक्षाचालकाने रिक्षा भरधाव वेगाने चालून एकास धडक देऊन जखमी केल्याप्रकरणी अज्ञात रिक्षाचालकाविरुद्ध जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




ही घटना १३ डिसेंबर रोजी सायंकाळी व साडेसहा वाजण्याच्या सुमारास कमल नगर दहिटणे येथे घडली.याप्रकरणी अर्जुन गुरुनाथ लोहार (वय-४२,रा.कमल नगर दहिटणे) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांची आत्या गिरजाबाई अर्जुन लोहार (वय-७०) या राहत्या घरातून फिरण्यासाठी मेन गेट उघडून घराबाहेर गेल्या असता,नवाज हॉटेल कडून येणारी अज्ञात रिक्षा चालकाने भरधाव वेगाने रिक्षा चालवून फिर्यादी यांच्या आत्यास जोराची धडक देऊन गंभीर जखमी करत न थांबता निघून गेला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार साळुंखे हे करीत आहेत.

---


## मुबंई येथे भव्य गुरव समाज महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईत धर्मवीर संभाजी महाराज मैदान खोतवाडी सांताक्रुज पश्चिम येथे होणार गुरव समाज बांधवांचा स्नेहमेळावा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरव विकास प्रतिष्ठान च्या माध्यमातून महाराष्ट्रातील तमाम समाज बांधवांनी स्नेहमेळावा कार्यक्रमात उपस्थित राहून गुरव समाज आणि एतिहासिक वारसा-परंपरा, हिंदू धर्म संस्कृती- संस्कार आणि गुरव समाजाचे योगदान याविषयी मान्यवरांचे मार्गदर्शन, गुरव समाजाची एतिहासिक माहिती देणारी स्मरणिका प्रकाशन, सकाळी ११ वाजता डॉक्टर नितिन ढेपे सर याचे उद्योग व्यवसाय मार्गदर्शन आणि संत काशिबा महाराज युवक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी याचे मार्गदर्शन होणार आहे . त्या नंतर सौ सुरक्षाताई साखरे याचे वधुवर मार्गदर्शन आणि उपवर-वधू विवाह नोंदणी कार्यक्रम होणार आहे.

गुरव विकास प्रतिष्टान २०२५ चे दिनदर्शिका प्रकाशन होणार असून. महोत्सवास नाव नोंदणी केलेल्या पुजारी बांधवांचा सन्मान करणे, ऑनलाईन स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांना रंगमंचावर कला सादरीकरणाची संधी आणि बक्षीस वितरण होईल. प्रमुख निमंत्रितांचा आणि गुरव समाजातील विविध क्षेत्रांत




पुरस्कार मिळविणारे गुणिजनांचा गौरव सन्मान सोहळा होणार आहे. तसेच गुरव संघटनेच्या नाव नोंदणी केलेल्या पदाधिकारींचा सन्मान सोहळा. त्यानंतर ह.भ.प.सोनुबाबा कुर्णेकर संस्थेचा हरीपाठ व कार्यक्रमाची सांगता.

प्रत्येक गुरव समाज पदाधिकारी कार्यकर्ते यांनी ह्या महोत्सवात गावा-मुंबई सह आजुबाजूच्या विभागातील कार्यकर्ते यानी समाज बांधवांच्या गाठीभेटी घेवून वैयक्तिक निमंत्रण देण्यावर भर देवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेवूया असे आवाहन गुरव विकास प्रतिष्ठाण चे अध्यक्ष श्री नवलजी गंगाराम शेवाळे यानी केले. सरचिटणीस अनिल सि गुरव,श्री प्रमोद द गुरव, कार्याध्यक्ष श्री रविन्द्र रा गुरव,सौ.सध्याताई स गुरव, श्री राजाराम र गुरव, प्रसाद म साळुंके, श्री सुरेश ल गुरव, श्री प्रशांत अं गुरव, श्री सुनील गुरव, रघुनाथ गुरव, सुर्यकांत गुरव युवाध्यक्ष ओमकार गुरव, वधू-वर नोंदणी प्रमुख सौ अवनी अ गुरव , सौ. विधी सं गुरव, सौ मुक्ताताई पुजारी, सौ लतिका सु गुरव आणि मुंबई चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने भव्य गुरव समाज महोत्सवाचे नियोजन सुंदर करण्यात आले आहे,तरी धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील सर्व गुरव समाज बंधू भगिनींनी या महोत्सवात आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन उमरगा तालुका गुरव समाजाचे रतन कुमार तळीखेडे, बाळासाहेब स्वामी, सचिन पाटील, ज्ञानेश्वर गुरव, बालाजी पाटील यांनी केले आहे.

---



## ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते किरनळीचे सुपुत्र चंद्रशेखर भांगे यांचा राज्यस्तरीय पत्रकार रत्न पुरस्काराने गौरव

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या १६ व्या छत्रपती संभाजी महाराज साहित्य संमेलनात अक्कलकोट तालुक्यातील किरनळीचे सुपुत्र आणि लोकशाही न्यूजचे पत्रकार चंद्रशेखर भांगे यांचा ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी साहित्य परिषदेचे अध्यक्ष शरद गोरे, फुलचंद नागटिळक विनोद अष्टुळ यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित होते.

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद सभागृहात आज मोठ्या दिमाखदार सोहळ्यात हा सत्कार समारंभ पार पडला..

पुण्यातील नामांकित हॉस्पिटल रुबी हॉल क्लिनिक किडनी राकेट, शिक्षक भरती घोटाळा, ससून रुग्णालयात सुरू असलेल्या ललित पाटील ड्रज रॅकेट या सह अनेक रॅकेटचा पत्रकार भांगे यांनी त्यांच्या बातमीदारीतून पर्दाफाश केलाय.

या सत्कार समारंभाला अक्कलकोट तालुक्यातील प्रा.राहुल रुही ,प्रा. सागर सोनकांबळे, द टाइम्स ऑफ इंडियाचे पुणे प्रतिनिधी यशपाल सोनकांबळे, मार्केट यार्ड भागातील सामाजिक कार्यकर्ते करण गायकवाड, डॉ. बाळा वाघमारे यांच्यासह अनेकांनी विशेष हजेरी लावली.

---

### रस्त्यावर पडली मोठ मोठे खड्डे,संबंधित विभागाचे दुर्लक्ष,वाहनधारक त्रस्त! मेरा खुर्द ते साखरखेर्डा रस्ता रुंदीकरणाच्या मागणीला जोर

# मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द रस्ता देत आहे वाहनधारकांना जिवंतपणीच मरण यातना!

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कैलास आंधळे/ चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द या ६ किलोमीटर रोडचे अतोनात हाल झाले असून,हा रस्ता वाहन धारकाच्या जीवावर उठला आहे,तर अनेक वाहनधारकांना कायमचे अपंग आले असून काही दवाखान्यांमध्ये उपचार घेत आहे.या रस्त्यावरून वाहने नेने म्हणजे तारेवरची कसरतच वाहनधारकांना करावी लागत आहे.हा रस्ता जागोजागी उखडला तरी लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाला लोकांचे मनके तुटत असले तरी काही सोयर सुतक दिसून येत नाही.मनुबाई,गुंजाळा,मेरा बुद्रुक येथील ग्रामस्थांना चिखली,बुलढाणा जाण्यासाठी हाच रस्ता आहे.त्यामुळे महसूल,शिक्षण,दवाखाना,किंवा खरेदीसाठी जाताना याच रोडने जावे लागते.परंतु,रस्ता पूर्णपणे उखडला असून,मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द या रस्त्यावर काही ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडून अनेक ठिकाणी रस्त्याची चाळन झाली आहे. वेळीच लोकप्रतिनिधींनी या रस्त्याबाबत आवाज उठवला नाही तर येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये त्याचे परिणाम लोकप्रतिनिधींना भोगावे लागेल असे अनेक नागरिक दबक्या आवाजात बोलताना दिसून येत आहे.मेरा खुर्द,साखरखेर्डा या रस्त्यावर नेहमी वाहनाची रहदारी असल्याने लहान-मोठे अपघात होत असूनसंबंधित विभागाने या रस्त्याची दुरुस्तीची मागणी जोर धरत आहे,मेरा बुद्रुक गावातुन जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाला मोठे भगदाड पडलेले असून अनेक वर्षापासून त्याच्याकडे सुद्धा संबंधित विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे. साखरखेर्डा - मेरा बुद्रुक - मेरा खुर्द हा रस्ता नेहमी वाहनाने गजबजलेला असतो.ह्या रोड वरून वाहनाची रहदारी ही जास्त असल्यामुळे दिवसातून अनेक वेळा या रस्त्यावर लहान मोठे अपघात होत असल्याने हा रस्ता वाहन धारकाच्या जीवावर उठल्याने जिवंतपणे वाहनधारकांना मरण यातना रस्त्यावरून जात असताना सोसाव्या लागत असल्याचे दिसून येत आहे. अनेक वर्षापासून साखरखेर्डा,मेरा खुर्द रस्त्या रुंदीकरणाची मागणी जोर धरत आहे.या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडले असून,तर काही ठिकाणी रस्त्याची चाळण झाली आहे.मेरा बुद्रुक फाटा येथे चौफुली असल्याने भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनामुळे एखादी मोठी जीवित हानी होऊ शकते त्यामुळे सुद्धा गतिरोधकाची मागणी जोर धरत आहे.तरी संबंधित विभागाच्या मेहरबान अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून ह्या रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे बुजवावे,अशी मागणी मेरा बुद्रुक,गुंजाळा,मनुबाई येथील वाहनधारका सह ग्रामस्थ करीत आहे.वेळीच प्रशासनाने ह्या रस्त्याबाबत पावले उचलले नाही तर मेरा बुद्रुक,अंत्री खेडेकर,मनुबाई,गुंजाळा येथील वाहनधारक थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे या रस्त्याबाबत तक्रार करणार असल्याचे खात्रीदायक वृत्त दैनिक दिव्य मातृछायाच्या हाती आले आहे.





**मेरा बुद्रुक गाव ते मेरा खुर्द रस्ता हा सर्व वाहनधारकांच्या जीवावर उठला असून संबंधित विभाग व लोकप्रतिनिधींनी वेळीच लक्ष घातल्यास,मेरा बुद्रुक, मनुबाई,गुंजाळा सह अनेक खेडेगावातील वाहनधारक सह नागरिकांना या रस्त्यावर जाताना जिवंतपणेच मरण यातना सोसावा लागत आहे.तरी स्थानिक प्रतिनिधींनी,लोकप्रतिनिधी व संबंधित विभाग यांनी वेळीच लक्ष घालून या रस्त्याबाबत ठोस उपाययोजना करून वाहनधारकासह ग्रामस्थांना होणारा त्रास थांबवावा.**

**- सुनिल चेके (वाहनधारक मेरा बुद्रुक)**

**मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द या रस्त्याचे झालेले अतोनात हाल बघता बुलढाणा जिल्ह्याचे केंद्रीयमंत्री व सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार ह्या रस्त्यावर लवकरात लवकर लक्ष घालतील व या रस्त्याचा मार्ग निकाली काढतील,मेरा खुर्द- साखरखेर्डा रस्त्याबाबत चालू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनात सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार मा.मनोज कायदे हे अधिवेशनात आवाज उठवतील अशी त्यांच्याकडून अपेक्षा.**

**- निखिल पाटील (मेरा बुद्रुक)**

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...



### दुचाकीच्या अपघातात पोलीस जखमी

सोलापूर (प्रतिनिधी) दुचाकींच्या अपघातात पोलीस जखमी झाल्याची घटना १५ डिसेंबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास सोलापूर पुणे हायवे लगत राजमुद्रा हॉटेल समोरील बाळे केगाव सर्विस रोड येथे घडली.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल संजय मोरे (वय-३५,रा.अ गवई पेठ,जुना बोरामणी नाका,रविवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एमएच.१३.ईएच.१८५६ या दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे फौजदार चावडी हद्दीत बाळे बीट मार्शल असे कर्तव्य करण्यासाठी सरकारी दुचाकी क्रमांक एमएच.१३. डब्लूएफ.२२७९ वर नेमले होते. फिर्यादी कर्तव्यावर असताना पाढे हद्दीत पेट्रोलिंग करत होते.तेव्हा सोलापूर-पुणे हायवे लगत वरील ठिकाणी संशयित आरोपी वरील क्रमांकाच्या दुचाकी वरील चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी निष्काळजीपणाने जोरात वेगाने चालवून फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक दिली.त्यावेळी फिर्यादी यांच्या डोक्याला,पायाला,हाताला व छातीस गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे. तसेच संशयित आरोपी हा स्वतः देखील दुखापत होण्यास कारणीभूत ठरला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

# संविधानाची विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : मेहकर - परभणी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील भारतीय संविधान शिल्पाची तोडफोड करुन देशद्रोही कृत्य करणाऱ्या दत्ता सोपान पवार या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीचे निवेदन तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई यांच्या नेतृत्वाखाली व शिष्टमंडळाने मेहकर ठाणेदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना निवेदन देण्यात आले.

१० डिसेंबर रोजी परभणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या शेजारी भारतीय संविधान शिल्पाची विटंबना दत्ता सोपान पवार या माथेफिरू इसमाने केल्याची घटना घडली आहे. स्वतंत्र भारतातील व्यक्तींचे सार्वभौमत्व हक्क देणारे भारतीय संविधान हे सर्वोच्च ग्रंथ आहे. भारतीय संविधानाची विटंबना करणे म्हणजे लोकशाही नाकारणारे कृती आहे. या देशामध्ये व राज्यांमध्ये विशिष्ट धर्माचे राष्ट्र होण्याची मनसुबे रचले जात आहेत. संविधानाची विटंबना करणे हा त्यातीलच एक भाग आहे.

संविधानाची विटंबना करणाऱ्या या माथेफिरूला देशद्रोहाच्या अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ शिक्षा करावी. परभणी येथे संविधानाच्या विटंबनेनंतर लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंबेडकरी समुदायावर गुन्हे दाखल करू नये. अन्यथा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा निवेदनाच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

यावेळी, मेहकर ठाणेदार साहेब यांनी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या शिष्टमंडळाचे निवेदन स्विकारून आपल्या मागण्या शासनाला कळविल्या जातील असे सांगितले.



यावेळी, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई, रवि मिस्कीन कुणाल माने, अख्तर कुरेशी, प्रकाश सुखधाने, नारायण इंगळे,समीर भाई शहा, राधेश्याम खरात, देवानंद आवसरमोल, दिपक गवई, शेख.राजुभाई, शाम कटारे यांच्यासह मेहकर तालुक्यातील समस्त पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## पंढरपूर येथे श्री दत्त जयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील स्वामी विवेकानंद चौक येथे श्री दत्त जयंती उत्सव समिती यांच्याकडून आयोजित करण्यात आले असून दत्त जयंती उत्सव समितीचा प्रारंभ होणार असून दत्त जयंती निमित्त सायंकाळी सहा वाजता श्रीमूर्ती ची पूजन व फुले टाकण्याचा कार्यक्रम असतो तरी या कार्यक्रमाला श्री दत्त उत्सव समितीकडून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.

श्री दत्त उत्सव समितीकडून आज श्री दत्त ची पूजा श्री विश्वजीत घोडके पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यानंतर आरती पूजा कीर्तन भजनाचे कार्यक्रम असतात

दिनांक १५ रोजी महाप्रसादाचे आयोजन प्रत्येक वर्षे प्रमाणे याही वर्षी सकाळी साडेअकरा वाजल्यापासून सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत महाप्रसाद च्या आयोजन केलेले आहे तरी महाप्रसादाचा सर्व बाह्य भक्तांनी लाभ घ्यावा अशी श्री दत्त उत्सव समिती यांच्याकडून आव्हान करण्यात येत आहे. श्री दत्त जयंती उत्सव समिती सहभागी व्हावे असे आव्हान श्री दत्त जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

श्री विश्वजीत घोडके पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचा सत्कार मा श्री राजेंद्र कोरके पाटील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी श्री दत्त उत्सव समितीचे अध्यक्ष श्री मंगेश मामाने, बाळासाहेब सगळे, प्रमोद आटकळे, राजू माळी, दिनेश सगरे, अंकुश शेळके, श्री कोरे व शहर पोलीस स्टेशनचे गायकवाड, शरद कदम, इत्यादी उपस्थित होते.

## औसा उड्डाणपूल व बायपास मागणीला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसाचे लोकप्रिय आमदार मा. आ. अभिमन्यू पवार साहेबांची मुंबईत भेट घेऊन शहरातील अतिशय महत्वाच्या असलेला औसा मोड व याकतपूर मोड उड्डाणंपूल तात्काळ व्हावा म्हणून माजी नगरध्यक्ष किरणअप्पा उटगे तसेच मी माझे मित्र जलील पठाण यांनी आग्रह धरला. हा उड्डाणपूल होणे शहरातील नागरिकांसाठी अतिशय महत्वाचे होते. याच विषयावर आमदार साहेबांवर आरोप केले गेले. हा विषय माजी नगराध्यक्ष किरण उटगे यांनी आमदार साहेबांच्या पुढे आग्रहाने मांडला. त्याला आ.पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत केवळ दोन दिवसातच थेट केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांची भेट घेऊन औसा उड्डाणं पूल व शहराच्या पूर्व व पश्चिम भागातून बायपास व्हावा यासह अनेक महत्वाच्या रस्त्याचा कामासाठी



मागणी केली आणि तात्काळ मंत्री गडकरी साहेबांनी आदेश देत वरील सर्व मागणी बाबत तात्काळ कारवाई करण्याचे सांगितले आणि यासाठी आजच औसाला केंद्रीय रस्ते पथक औसात दाखल होत आहे.

केंद्रीय मंत्री गडकरी साहेब व आ अभिमन्यू पवार यांचे औसा तालुक्याच्या वतीने आभार मानले.

## सावरकर विद्यालय कोठुरे येथे शालेय विज्ञान प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे विज्ञान छंद मंडळ अंतर्गत विज्ञान प्रदर्शन व विज्ञानावर आधारित रांगोळी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते✻



कार्यक्रमासाठी मविप्र ज्येष्ठ सभासद मोतीराम पा मोगल, शालेय समितीचे सदस्य विष्णू मोगल, प्रकाश कोरडे, जितेंद्र पोटे व ग्रामस्थ, विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सानप.,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सानप यांनी प्रास्ताविकात म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला पाहिजे. शून्याचा शोध लावणारे आर्यभट्ट, भौतिक शास्त्रज्ञ सी व्ही रामन, अनुशास्त्रज्ञ होमी भाभा, विक्रम साराभाई ,डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन तसेच त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपणही नवनवीन प्रकारचे संशोधन करावे .नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. देशाची सेवा करावी संकट काळामध्ये देश कार्याच्या मदतीस यावे असे आव्हान केले. मविप्रचे ज्येष्ठ सभासद मोतीराम पा मोगल यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शन व विज्ञानावर आधारित शालेय रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक किरण भडांगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील विज्ञान शिक्षिका अनिता पवार,अर्चना कुटे, सुरेखा झोमान,प्रियंका आव्हाड यांच्यासह विज्ञान छंद समिती प्रमुख रोशन दवते, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## परभणीतील घटनेचा भिवंडी बहुजन विद्यार्थी संघटनेने केला निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : परभणी जिल्ह्यात झालेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचा संविधानाच्या प्रतीची विटंबना करणाऱ्या माथेफिरू ची नार्कोटेक्स करावी आणि त्या मागचा सूत्रधार कोण आहे. याचा लवकर तपास करण्यात यावा अशी मागणी बहुजन विद्यार्थी संघटना भिवंडी शहर यांच्या वतीने भिवंडी शहर डी. सी. पी. एम. एम. दहिकर याना निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी निवेदन देण्यासाठी बहुजन विद्यार्थी संघटना भिवंडी शहर नितेश गायकवाड, महासचिव सचिन गायकवाड ,उपाध्यक्ष सुशील साठे, महिला अध्यक्षा निशा भोईर, सल्लागार नरेश मोरे, संघटक नंदन अहिरे , फिझा अन्सारी उपस्थित होते.

**हरीनामाचा गजर**

**तीन दिवसीय पुण्यतिथी उत्सवात थंडी असूनही शिष्यभाविकांची गर्दी**

# सद्गुरू ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यतिथी सोहळ्याची गोपाळकाल्याने सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा /प्रतिनिधी :

श्री सचिदानंद सद्गुरू विरनाथ मल्लिनाथ महाराज संस्थानचे चौथे पिठाधिपती समर्थ सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण सोहळ्याची सांगता भक्ती उत्साहात रविवार दिनांक १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता दहीहंडी फोडून गोपाळकाल्याने झाली. यावेळी विठ्ठलाचा व सद्गुरुनामाच्या जयघोषाने श्रीक्षेत्र गोपाळपूर आसमंत दुमदुमून गेला होता.

पिठाधीपती सद्गुरु गुरुबाबा महाराज यांच्या अधिपत्याखाली ३ दिवसीय पुण्यतिथी उत्सवात थंडी असूनही शिष्यभाविकांची गर्दी

सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५व्या पुण्यतिथीस दिनांक १३ डिसेंबर शुक्रवारी स्थापना पुजेने आरंभ झाला. ह भ प श्री गोरखनाथ महाराज औसेकर यांनी सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज यांच्या पावन समाधीचा महाअभिषेक केला. उत्सवामध्ये तिन्ही दिवस दोन्ही वेळेला स्थापनेची पूजा परंपरेचे अभंग अभंग हरिपाठ आणि सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांचे सायंकाळी ७वाजता नित्यनेमाचे प्रासादिक चक्रीभजन नंतर हरिकीर्तन व हरिजागर असे भरगच्च नामसंकीर्तन श्रवणाचा लाभ भक्तांना मिळाला. त्याचप्रमाणे दोन्ही वेळेस महाप्रसादाची सोय संस्थांतर्फे करण्यात आली होती.

शनिवार दि.१४ रोजी पद्मश्री पं. सतीशजी व्यास यांच्या संतूर वादनाने रसिकांचे कान तृप्त

मोठ्या शहरांमधून तिकीट लावून देखील जो कार्यक्रम पाहणे कठीण असते असा जगविख्यात पद्मश्री पंडित श्री सतीशजी व्यास यांच्या संतूर वादनाचा कार्यक्रम केवळ ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपाशीर्वादाने

त्यांचे नातू ह भ प श्री ज्ञानराज महाराज हे पंडित सुहास व्यास यांच्याकडे शास्त्रीय गायनाचे शिक्षण घेत असल्यामुळे आणि महत्त्वाचे म्हणजे विरनाथ महाराजांपासून व्यास या तेर येथील संत घराण्याचा जिव्हाळ्याचा भक्ती संबंध असल्याने हा योग जुळून आला सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज व सद्गुरु श्री

गहिनीनाथ महाराज यांच्या विषयी व्यास कुटुंबीयांचा असणारी जवळीक व प्रेम यामुळे पंडित सतीशची व्यास यांचे संतूर वादन औसेकर रसिक श्रृत्यांना ऐकायला लाभले हे खरे. सलग तिसऱ्या वर्षी ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यात कला सेवा दरबार भरवण्याची ज्ञानराज



महाराज यांची संकल्पना रसिकासाठी एक संगीत मेजवानी ठरली आहे.

या सेवा दरबारात ह भ प श्री ज्ञानराज गुरुबाबा महाराज औसेकर

पंडित श्री आनंद बेंद्रे. यांचे शास्त्रीय गायन संपन्न झाले. पंडित सतीश व्यासजींना प्रख्यात तबलावादक श्री मुकुंदराज देव यांनी उत्कृष्ट साथ केली तर शास्त्रीय गायनात चिरंजीव प्रसाद कुलकर्णी यांनी तबल्याची चांगली साथ केली संवादिनी करता श्री शारंग बेलोबी यांनी चांगली साथ दिली. या संगीत व शास्त्रीय गायन कला सेवा दरबार सोहळ्याचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार

नाथ संस्थानचेवर श्रद्धा प्रेम असणारे श्री.बसवराज पाटील यांच्या व सद्गुरु श्री गुरूबाबा महाराज औसेकर सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर,श्री गोरखनाथ महाराज औसेकर,श्री.बसवंतराय

देशमुख, श्री मच्छिंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. अत्यंत रेखीव व श्रवणीय असा हा सेवा दरबार रसिकासाठी पर्वणी ठरला.

दत्त जयंतीदिनी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांचे पुण्यतिथी दिवशी भव्य दिव्य स्वरूपात स्थापनेची पुजा आरती सेवेचे

**सद्गुरुमुळेच आम्ही तयार झालो, गहिनीनाथ महाराज औसेकर**

उत्सव प्रथम दिनी गहिनीनाथ महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली घेता गुरुचे दर्शन मन विसरे विषय ध्यान गुरुनामाचा प्रताप ब्रह्म होय आपोआप पडदा मायेचा तुटला हात मला प्रवेशला

या द्वितीय सत्तपुरुष सद्गुरु श्री मल्लाप्पा महाराजांच्या अभंगावर गुरूंच्या महतीविषयीची चिंतन मांडताना आज आम्ही या गुरुवारी ची सेवा करण्यास जे तयार झालो जे अध्यात्मिक ज्ञान माहिती आणि सेवा करू शकतो ते केवळ सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्यामुळेच त्यांच्याकडून आम्ही व्यवहारही शिकला आणि परमार्थही शिकलो वेळेला अत्यंतिक महत्त्व देणारे आणि निष्प्रह शुद्ध भावनेतून परमार्थिक सेवा करण्याचे सूत्र आम्हला आमच्या वडिलांनी दिले त्यांनी या संस्थांचा शिष्यवर्ग महाराष्ट्र आंध्र कर्नाटक तेलंगणा यासह पाश्चात देशात देखील निर्माण केला त्यांचे परमार्थिक कष्टाचे वैभव आज आपल्याला पाहायला मिळते आहे

गुरुचे दर्शन घेतले त्यांची कृपा झाली की भगवंत आपोआप आपल्या वर कृपा करतो असे महाराजांनी चिंतनात स्पष्ट केले

दत्त जयंती पुण्यतिथीदिनी ह भ प ज्ञानराज महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न

उत्सवात पुण्यतिथी दिनी ह भ प श्री धनराज महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा समाधी संमुख संपन्न झाली नमावे ते नित्य सद्गुरु चे पाय या अभंगावर अत्यंत भक्तीपरचुर व रसाळ वाणीतून ज्ञानराज दादांनी गुरु चरण सेवेची महती व गुरुकृपेचा चमत्कार आपल्या वाणीतून विशद केला.

रविवारी ५ वाजता गोपाळ काल्याने पुण्यतिथी उत्सवाची उत्साहात सांगता

रविवारी काल्याच्या दिवशी औसा पंचक्रोशी सह महाराष्ट्र आंध्र कर्नाटक तामिळनाडू राज्यातून शेकडो भाविक सद्गुरूंच्या दर्शनासाठी व काल्याचा महाप्रसाद घेण्यासाठी आवर्जून गर्दी करून होते दुपारी सद्गुरूंच्या पालखीसह दिंडी निघून पावन समाधी मंदिराची प्रत्यक्ष प्रदक्षिणा अभंग म्हणत टाळ मृदंगाच्या गजरात सद्गुरु नामाच्या विठ्ठलाच्या ज्ञानदेव तुकाराम च्या नामघोशात परिपूर्ण करून नंतर सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात काल्याचे अभंग वाळवंटी खेळ, खेळ खेळूया, फुगडी, भुलई, काल्याचा अभंग म्हटल्यानंतर श्री गोरखनाथ महाराज श्री रविंद्र महाराज यांच्या

हस्ते दहीहंडी फोडून गोपाळकाला संपन्न झाला गोपाळकाला गोड झाला गोविंदाने गोड केला म्हणत सद्गुरु दर्शनाने तृप्त होऊन प्रसन्न चित्ताने व समाधानाने पुण्यतिथी उत्सवास आलेले भाविक आपापल्या गावी रवाना झाले.